खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२५ – २६

## क्रीडा विभाग

केसरी

किरण खुडे (पत्रकार)

### राजगुरू महाविद्यालयात मॅरेथॉन स्पर्धा

**राजगुरुनगर, (वार्ताहर) :** येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयाच्या वतीने राष्ट्रीय क्रीडा दिन व हुतात्मा राजगुरू जयंतीचे औचित्य साधून मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. वरिष्ठ व कनिष्ठ गटातील स्पर्धेत १९५ विद्यार्थी स्पर्धकांनी स्पर्धेत सहभाग घेतला.

स्पर्धेचे उद्घाटन संस्थाध्यक्ष ह. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, चांडोली ग्रामीण रुग्णालयाचे डॉ.वाघमारे, डॉ. कांबळे , प्राचार्य डॉ.गिरीश पिंगळे, प्राचार्य डॉ. एस. एम.जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. विठ्ठल दौंडकर उपस्थित होते.



विद्यार्थ्यांसाठी पाच कि.मी. तर विद्यार्थिनींसाठी तीन कि.मी. अशी स्पर्धा झाली. वरिष्ठ गटात मुलांमध्ये राहुल पारधी, संकेत भोईर, गौरव लोखंडे यांचा तर मुलींमध्ये सिद्धी कोहिनकर, समृद्धी दरवडे, पूर्वा कोतवाल यांचा अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक आला. तर कनिष्ठ गटात मुलांमध्ये तनिष भोकसे, गौतम चौधरी, ऋषिकेश भोकसे यांनी तर मुलींमध्ये श्रावणी लंगोटे, अंकिता मंडलिक, दिव्या सुतार यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला. विजयी खेळाडूंचा सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन गौरव करण्यात आला.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
01 Sep 2025 - Page 4

# राजगुरू महाविद्यालयात मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन

**किरण खुडे**



**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयाच्या वतीने राष्ट्रीय क्रीडा दिन व हुतात्मा राजगुरू जयंतीचे औचित्य साधून मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. वरिष्ठ व कनिष्ठ गटातील स्पर्धेत १९५ विद्यार्थी स्पर्धकांनी स्पर्धेत सहभाग घेतला.

स्पर्धेचे उद्घाटन संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, चांडोली ग्रामीण रुग्णालयाचे डॉ.वाघमारे, डॉ. कांबळे , प्राचार्य डॉ.शिरीष पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम.जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. विठ्ठल दौंडकर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांसाठी पाच कि.मी. तर विद्यार्थिनींसाठी तीन कि.मी. अशी स्पर्धा झाली. वरिष्ठ गटात मुलांमध्ये राहुल पारधी, संकेत भोईर, गौरव लोखंडे यांचा तर मुलींमध्ये सिद्धी कोहिनकर, समृद्धी दरवडे, पूर्वा कोतवाल यांचा अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक आला. तर कनिष्ठ गटात मुलांमध्ये तनिष भोकसे, गौतम चौधरी, ऋषिकेश भोकसे यांनी तर मुलींमध्ये श्रावणी लंगोटे, अंकिता मंडलिक, दिव्या सुतार यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला. विजयी खेळाडूंचा सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन गौरव करण्यात आला. या स्पर्धेच्या निमित्ताने उपस्थित प्रमुख अतिथी, प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी स्वतःला व आपल्या कुटुंबाला तंदुरुस्त ठेवण्याची शपथ घेतली.

संचालक हिरामण सातकर यांनी मनोगतात विद्यार्थ्यांना शारीरिक व मानसिक दृष्ट्या तंदुरुस्त राहून स्वतःला सिद्ध करण्याचे आवाहन केले. या स्पर्धेचे आयोजन डॉ. प्रतिमा लोणारी, प्रा. सारिका गोरे, प्रा. योगेश मोहिते, प्रा.मोनाली काळे यांनी केले.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, सूत्रसंचालन प्रा. मच्छिंद्र मुळूक तर आभार प्रा. सारिका गोरे यांनी मानले.

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड** : राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालय आणि साहेबराव बुट्टेपाटील महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि २९) मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. पुणे-नाशिक महामार्गावरील जुन्या खेड घाटात आयोजित करण्यात आलेल्या या धावण्याच्या शर्यतीत हुतात्मा राजगुरू महाविद्यालयासह जिल्ह्यातील अनेक विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला.

स्पर्धेचा शुभारंभ खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, जिल्हा सहकारी बोर्डाचे अध्यक्ष हिरामण सातकर आणि संचालक बाळासाहेब सांडभोर यांच्या हस्ते झाला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, प्रा. डॉ. संजय शिंदे, डॉ. पायल ओसवाल, गणेश आहेरकर यांच्यासह महाविद्यालयातील क्रीडा शिक्षक आणि इतर प्राध्यापकांनी स्पर्धेचे संयोजन केले. अध्यक्ष अ‍ॅड देवेंद्र बुट्टे पाटील यांनी सांगितले की, "अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, सहकार्य आणि स्पर्धात्मक भावना विकसित होते. राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आयोजित या मॅरेथॉनने विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रात पुढे जाण्यासाठी प्रेरणा दिली आहे." स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षक, कर्मचारी आणि स्वयंसेवकांनी केलेल्या सहकार्याचेही त्यांनी कौतुक केले.

## राजगुरू महाविद्यालयात मॅरेथॉन स्पर्धेला प्रतिसाद



**राजगुरुनगर :** खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयाच्या वतीने राष्ट्रीय क्रीडा दिन व हुतात्मा राजगुरू जयंतीचे औचित्य साधून मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. वरिष्ठ व कनिष्ठ गटातील स्पर्धेत १९५ विद्यार्थी स्पर्धकांनी सहभाग घेतला. स्पर्धेचे उद्घाटन संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, चांडोली ग्रामीण रुग्णालयाचे डॉ.वाघमारे, डॉ. कांबळे , प्राचार्य डॉ.शिरीष पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम.जरे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. विठ्ठल दौंडकर उपस्थित होते. या स्पर्धेचे आयोजन डॉ. प्रतिमा लोणारी, प्रा. सारिका गोरे, प्रा. योगेश मोहिते, प्रा.मोनाली काळे यांनी केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, सूत्रसंचालन प्रा.मच्छिंद्र मुळूक तर आभार प्रा. सारिका गोरे यांनी मानले.

Pimpri Chinchwad Edition
Aug 30, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख